**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी- ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक –५४</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

<u>दिनांक –१८.३.२०२१</u> <u>वेळ –दुपारी २.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मार्च-२०२१ ची मासिक मा.महापालिका सभा गुरुवार दिनांक १८/३/२०२१ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे - महापौर

२) मा.कुंदन अंबादास गायकवाड

३) मा.वसंत प्रभाकर बोराटे

४) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे

५) मा.बुर्डे सुवर्णा विकास

६) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

७) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

८) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

९) मा.गोफणे अनुराधा देविदास

१०) मा.बारसे प्रियांका प्रविण

११) मा.अजित दामोदर गव्हाणे

१२) मा.लांडगे रवि लक्ष्मण

१३) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

१४) मा.अॅड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

१५) मा.सावळे सिमा रविंद्र

१६) मा.लांडे विक्रांत विलास

१७) मा.गीता सुशिल मंचरकर

१८) मा.राहुल हनुमंतराव भोसले

१९) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

२०) मा.केशव हनुमंत घोळवे

२१) मा.मंगला अशोक कदम

२२) मा.तुषार रघुनाथ हिंगे

२३) मा.अश्विनी भिमा बोबडे

२४) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

२५) मा.संजय बबन नेवाळे

२६) मा.भालेकर प्रविण महादेव

२७) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

२८) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

२९) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३०) मा.घोलप कमल अनिल

३१) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३२) मा.चिखले सचिन तुकाराम

३३) मा.यादव मीनल विशाल

३४) मा.वैशाली जालिंदर काळभोर

३५) मा.राजू मिसाळ

३६) मा.बाबर शर्मिला राजू

३७) मा.अमित राजेंद्र गावडे

३८) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३९) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४०) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

४१) मा.भोईर सुरेश शिवाजी

४२) मा.अपर्णा निलेश डोके

४३) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४४) मा.गावडे राजेंद्र तानाजी

४५) मा.जयश्री वसंत गावडे

४६) मा.कोमल दिपक मेवानी

४७) मा.सुलक्षणा राजू धर

४८) मा.शाम गणपतराव लांडे

४९) मा.सुजाता सुनिल पालांडे

५०) मा.योगेश मंगलसेन बहल

५१) मा.कदम निकीता अर्जुन

५२) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

५३) मा.नढे विनोद जयवंत

५४) मा.पाडाळे निता विलास

५५) मा.काळे उषा दिलीप

५६) मा.बारणे अर्चना तानाजी

५७) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

५८) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

५९) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

६०) मा.बारणे माया संतोष

६१) मा.निलेश हिरामण बारणे

६२) मा.कलाटे राहुल तानाजी

६३) मा.कामठे तुषार गजानन

६४) मा.चोंधे आरती सुरेश

६५) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

६६) मा.सविता बाळकृष्ण खुळे

६७) मा.सुनिता हेमंत तापकीर

६८) मा.चंद्रकांत बारकु नखाते

६९) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

७०) मा.कुटे निर्मला संजय

७१) मा.आंगोळकर सागर सुनिल

७२) मा.मुंढे उषा अंकुश

७३) मा.लोखंडे चंदा राजू

७४) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

७५) मा.आशा धायगुडे-शेंडगे

७६) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

७७) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

७८) मा.संतोष बबन कांबळे

७९) मा. भाऊसाहेब सोपानराव भोईर

८०) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

८१) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.राजेश पाटील-आयुक्त, मा.ढाकणे-अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप-नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त (३), मा.कुंभोजकर-मुख्य लेखापरिक्षक, मा.डॉ.रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.पवार-उपसंचालक (नगररचना), मा.कोळंबे-मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.इंगळे, मा.चितळे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत- उपआयुक्त, मा.भालकर, मा.सवणे- सह शहर अभियंता, मा.शिंदे-प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे-अति. आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठता वायसीएमएच, मा.कुलकर्णी, मा.भोसले- कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे-पशुवैदयकीय अधिकारी, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक, मा.नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

१) वैद्यकीय व वायसीएम रुग्णालयांना आवश्यक असलेली वैद्यकीय अधिकारी, स्टाफनर्स, फार्मासीस्ट, सफाई कर्मचारी इ विविध तांत्रीक पदे भरणेकामी निविदा प्रक्रीया करण्यात येऊन एजन्सी (Outsource) नियुक्त करण्याची प्रक्रीया राबविण्यात येणार असल्याने त्यास मान्यता देणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता –

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६१८ विषय क्रमांक - १
दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.डक्षेका/१/कावि/१५५/२०२१, दि.०८/०२/२०२१
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८३९३ दि.१०/०२/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत बालेवाडी क्रीडा संकुल मधील खेळाडुंचे वसतीगृह येथील इमारती मधील A, B, C ह्या तीन इमारती कोविड केअर युनिटसाठी वापरल्या आहेत. त्यामुळे काही इमारती व क्रीडा संकुलनातील इमारती पुणे मनपाने कोविड केअर युनिटसाठी वापरल्या आहेत. बालेवाडी क्रीडा संकुलनाचे वीज वापराचे बिल भरणे बाबत क्रिडा व युवक सेवा संचनालय, मा.आयुक्त शिवछत्रपती क्रिडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी कडील पत्र क्रमांक क्रीयुसे/कोविसा/इलेक्ट्रक/२०२०-११/२३४ दि.१७/०८/२०२० नुसार विज बिला पोटी माहे एप्रिल २०२० ते जुलै २०२० अखेर एकुण र.रू.७३,१४,३८०/-इतकी रक्कम भरणे बाबत विनंती केली आहे. सदर कालावधीत बालेवाडी क्रीडा संकुल पिंपरी चिंचवड मनपा व पुणे मनपा यांनी कोविड -१९ साठी सामुदायीकरित्या वापरले असल्याने एकुण विजबीलाच्या ६० % पुणे मनपा व ४०% रक्कम पिंपरी चिंचवड मनपा मार्फत अदा करणेबाबत मा.आयुक्त यांनी दिनांक ०६/०१/२०२१ रोजी चे मंजुर प्रस्तावा नुसार मान्यता दिली आहे त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगर पालिके मार्फत माहे एप्रिल २०२० ते जुलै २०२० अखेर एकुण विजबीलाच्या ४०% रक्कम र.रू.२९,२५,७५२/- इतकी रक्कम मा.डायरेक्टर स्पोर्टस् अन्ड युथ सर्विसेस सिंकिंग फंड शिवछत्रपती क्रिडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी यांना मनपाने अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-
अनुकूल- ७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६१९ विषय क्रमांक - २
दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८४२४ दि.१०/०२/२०२१

तुळापुर येथे श्री.छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान स्थळ दरवर्षी फाल्गुन अमावस्येला बलिदान दिन/छत्रपती संभाजी महाराजांची पुण्यतिथी म्हणून साजरी केली जाते. या ठिकाणी पिंपरी चिंचवडसह राज्यातील विविध भागातून जनता दर्शनासाठी येत असते, ग्रामपंचायतीला सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधी अभावी अडचणी येत असतात. तरी छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान दिनानिमित्त तुळापुर ग्रामपंचायतीस महाराजांचे समाधी स्थळाचे ठिकाणी मंडप व्यवस्था, लाईट व्यवस्था, पिण्याचे पाणी, हारफुले इ. करिता दरवर्षी र.रू.२,९९,०००/- (अक्षरी र.रू.दोन लाख नव्यान्नव हजार फक्त) देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६२० विषय क्रमांक -३
दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वृक्ष/४/कावि/७४/२०२१, दि.१०/०२/२०२१
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.८४७२ दि.१७/२/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे जतन

अधिनियम १९७५ प्रकरण ६ कलम १६ अन्वये मा.वृक्षप्राधिकरण समितीने तयार केलेले सन २०२०-२१ चे सुधारीत व सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रकास महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. सबब सोबत प्रमाणे मा.वृक्षप्राधिकरणाने तयार केलेले व मंजुर केलेले अंदाजपत्रक असुन २०२०-२१ चे सुधारीत र.रू.२०,३७,३०,०००/- व सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रक र.रू. ३६,६४,८०,०००/- इतके आहे. सदर अंदाजपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.राहुल कलाटे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक, नगरसेवीका. माई, मागच्या मिटींगला याच्यावर चर्चा झाली होती की आपण याच्यासाठी सेप्रेट चर्चा करु परंतु सगळयांच्याच माईंडमधून ते निघून गेलं. सुधारीत र.रु.२०,३७,३०,०००/- होतं आणि त्यात मला वाटत मुळ अंदाजपत्रक र.रु. ३६,६४,८०,०००/- झाल. काल परवा वर्तमानपत्रामध्ये एक चांगली बातमी होती की पाच वर्षात वृक्ष प्राधिकरण समितीने २२ हजार झाड कट करण्याची परवानगी दिली. मला असं वाटत की आपण ही झाड वर्षभरात लावतो, वृक्ष संवर्धनसारखा महत्वाचा विषय आहे. असं असताना या मागच्या मिटींगला पण आम्ही आपल्याला विनंती केली होती की याचा ऊहापोह झाला पाहीजे. पर्यावरण आणि वृक्ष संवर्धन या महत्वाच्या विषयावर एक सेप्रेट जनरल बॉडी जर घेता आलीतर ती व्हायला पाहीजे होती. परंतु आता सध्याची कोरोनाची परिस्थिती पाहीली किंवा सभागृहात येण्याची पध्दत पाहीली हे आम्हांला अपेक्षीत नव्हतं. परंतु हे होत असताना गायरान व मोकळी जागा येथे वृक्षारोपण करणे. मला वाटते मागच्या वर्षी त्याठिकाणी एक सीआर होते यावर्षी सुध्दा एक सीआर करतो. काल परवा इंगळे साहेबांकडे उदयानचा चार्ज असल्यामुळे त्यांनी पण डिव्हायडरचे चांगल्याप्रकारे टेंडर केलं होतं. परंतु हे सर्व होत असताना वृक्षसंवर्धन सारख्या महत्वाच्या विषयावर खरतर चर्चा व्हायला पाहीजे.

**मा.महापौर-** हे बजेट आपण मंजूर करु आणि आपली बजेटची मिटींग आहे त्यावेळेस याच्यावर चर्चा करु. विषय क्रमांक ३ मंजूर.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६२१ विषय क्रमांक -४
दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.अक्षेका/पापु/४/कावि/०८/२०२१, दि.१२/०२/२०२१
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.८४९४ दि.१७/०२/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील वाहतुकनगरी लगत हद्दीबाहेरील भाग जसे सिध्दीविनायक नगरी, श्रीविहारनगरी, श्रीनगरी, दत्तनगर व आशिर्वाद कॉलनी या भागास मानवतेच्या दृष्टिकोनातुन पुर्वीपासुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे दैनंदिन पाणीपुरवठा करणेत येत आहे. सद्यस्थितीत या भागात एकुण ३८ नळजोड असुन ४"-१, ६"-१, १"-२ व १/२"- ३४ अशी नळजोड आहेत. संबंधित नळजोड हे त्या त्यावेळी नावानिशी मा.महापालिका सभेत मंजुर करणेत आलेले आहेत. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी त्यांचेकडील पत्रामध्ये देहुरोड कॅन्टोमेंट बोर्डाची स्वतंत्र पाणीपुरवठा योजना असुनही जलवितरण व्यवस्था अभावी आशिर्वाद कॉलनी, दत्तनगर परिसरात सुमारे ३५ ते ४० कुटुंब पाण्यापासुन वंचित आहेत. तरी या सर्व बाबींचा विचार करता देहुरोड कॅन्टोमेंट बोर्डाव्दारे पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत महापालिकेव्दारे एक स्वतंत्र पाणी कनेक्शन मुख्य कार्यकारी अधिकारी, देहुरोड कॅन्टोमेंट बोर्ड या नावाने मंजुर करणेबाबत विनंती केलेली आहे व याची देयके देहुरोड कॅन्टोमेंट तर्फे भरणेची ग्वाही दिलेली आहे. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी देहुरोड कॅन्टोमेंट बोर्ड यांनी इकडील विभागास खालीलप्रमाणे माहिती अवगत केलेली आहे.

1. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी देहुरोड कॅन्टोमेंट बोर्ड यांनी त्यांचे विभागामार्फत सदर क्षेत्राचा सर्व्हे केला असून सदर सर्व्हेनुसार त्यांचे हद्दीत १२४२ मिळकतीची नोंद असून त्याची लोकसंख्या अंदाजे ६२१० इतकी आहे.
2. त्यांचे मागणीनुसार ६२१० लोकसंख्येसाठी १३५ लिटर /प्रति माणसी व प्रति दिनी अशी एकूण ८३८३५० लीटर प्रतिदिनी पाण्याची आवश्यकता असलेबाबत कळविलेले आहे.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी देहुरोड कॅन्टोमेंट बोर्ड यांचे मागणीप्रमाणे स्वतंत्र नळजोड मंजुर केलेस या नळजोडापासुन देहुरोड कॅन्टोमेंट बोर्ड त्यांचे

हद्दीमध्ये स्वतंत्रपणे वितरण नेटवर्क विकसित करेल व या वितरण नेटवर्कमध्ये देहुरोड कॅन्टोमेंट बोर्डाचे सर्वेक्षणनुसार एकुण १२४२ कुंटुंबासाठी (अस्तित्वातील ३८ नळजोडासह) नळजोड त्यांचेमार्फत मंजुर करून त्यांनी विकसित केलेल्या वितरण नेटवर्क वरती स्थानांतरीत करतील, याकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिकामार्फत पालिका हद्दीमध्ये स्वतंत्र जलमापक बसविणेत येईल व जलमापकाचे रिडींग नुसार वापरलेल्या पाणी परिमानाचे पाणी बील हे मुख्य कार्यकारी अधिकारी, देहुरोड कॅन्टोमेंट बोर्ड यांचे नावे अदा करणेत येईल. सद्यस्थितीतील पाणीपुरवठा वितरण स्थिती पाहता नळजोडाचा व्यास हा ६" असावा असे वाटते, तसेच महापालिकाहद्दीत पाण्याचा दर हा प्रचलित म्हणजे स्लॅब व टेलिस्कोपिक पध्दतीचा आहे. ही पध्दत संबंधितांना अवलंबिणे शक्य होणार नाही. तसेच व्यापारी दराने आकारणी करणेस ही योग्य होणार नाही. तरी उत्पन्न, वितरण खर्च व ना नफा। तोटा तत्वानुसार पाण्याचा दर हा ठोक (Lump sum) पध्दतीने म्हणजे घरगुती वापरासाठी दर प्रती युनिट (हजार लिटर) र.रु.१६.५४ असा असावा तर पाणी वापराच्या ५ टक्के पाण्याचा वापर व्यापारी गृहित धरून त्यासाठीचा प्रति युनिट दर (हजार लिटर) र.रु.५५.१३ असा राहिल. सदरचे घरगुती वापराचा (र.रु.१६.५४ प्रति युनिट) दर हा मा.सह शहर अभियंता पाणीपुरवठा यांचेकडील आदेश क्र.पापु/जशुके/९१/२०१९ दिनांक २९/०३/२०१९ मधील शासकिय/निमशासकिय यांचेसाठीचा आहे, तर व्यापारी वाणिज्य वापराचा दर ५५.१३ (प्रति युनिट) सन २०२०-२१ साठीचा आहे, तसेच या दरामध्ये दरवर्षी ५ टक्के वाढ होत राहणार आहे. तरी Bulk connection चा व्यास ६" मंजुर करणेत यावा. यासाठी घरगुती वापरासाठी पाण्याचा दर प्रती युनिट (हजार लिटर) र.रु.१६.५४ आकारावा असे वाटते, तसेच एकुण पाण्यापैकी ५ टक्के पाण्याचा वापर व्यापारी गृहित धरून त्यासाठीचा प्रति युनिट दर (हजार लिटर) र.रु.५५.१३ असा राहिल, तसेच या दरामध्ये दरवर्षी ५ टक्के वाढ होत राहणार आहे. सबब जर देहुरोड कॅन्टोमेंट बोर्ड यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत ६" नळजोड दयावयाचा झालेस खालील अटीस अधिन राहुन नळजोड देणे योग्य राहील.

1. पिंपरी चिंचवड महानगरपालिका ६" नळजोडामार्फत करण्यात येणारा पाणीपुरवठयासाठी देहुरोड कॅन्टोमेंट बोर्ड यांनी स्वत:ची स्वतंत्र वितरण व्यवस्था विकसित करावी, तसेच सदर वितरण व्यवस्थेची देखभाल दुरुस्ती व संबंधित मिळकत धारकांची बिल वसुली देहुरोड कॅन्टोमेंट बोर्डामार्फत करण्यात यावी.
2. सदर ६" नळजोडावर बसविणेत येणारा जलमापक (water meter)

देहुरोड कॅन्टोमेंट बोर्डामार्फत बसविणेत यावा व सदर जलमापकाची (water meter) देखभाल दुरुस्ती देहुरोड कॅन्टोमेंट बोर्डामार्फत करणेत यावी व मीटर रिडींग प्रमाणे होणारे बील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस अदायगी करावी.

3. सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उपलब्ध पाण्याचा विचार करता देहुरोड कॅन्टोमेंट बोर्डासाठी सदर ६" नळजोडातुन करणेत येणारा पाणीपुरवठा हा उपलब्ध साठयानुसार करणेत येणार आहे.

4. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी कॅन्टोमेंट बोर्ड यांचे मागणीनुसार सद्यस्थितीत त्यांनी ८३८३५० लिटर/प्रतिदिनी इतकी पाण्याची मागणी केलेली आहे. तरी सद्यस्थितीचा विचार करता एवढया मोठया प्रमाणात पाण्याची मागणी पुर्ण करणे शक्य होणार नाही. तरी सद्यस्थितीचा विचार करता ५,००,००० लिटर प्रतिदिन इतक्या मर्यादेतच पाणीपुरवठा करणेत येईल.

5. सद्यस्थितीत, हद्दीबाहेरील या भागात म.न.पा.मार्फत मंजूर असलेल्या ३८ नळजोडांची कनेक्शनही या १५० मी.मी.मुख्य कनेक्शनवर जलमापकानंतर जोडण्यात यावीत. सबब, या ३८ नळजोडांच्या पाणी बिलांची तसेच भविष्यातील नळजोडांच्या पाणीबीलाची जबाबदारी देहुरोड कॅन्टोमेंट बोर्डाची राहिल.

6. सदर नळजोडाचे पाणी बील देहुरोड कॅन्टोमेंट बोर्डास प्रत्येक महिन्यास देण्यात येईल प्रत्येक बिलाची रक्कम महिना संपण्यापुर्वी देणेत यावी उशिर झाल्यास १० टक्के प्रतिवर्ष या दराने बिलावर व्याज आकारणी करणेत येईल.

7. म.न.पा.ने ठरवुन दिलेल्या मर्यादेपेक्षा पाण्याचा अतिरिक्त वापर झालेस अतिरिक्त पाण्याच्या परिणामाचे देयक मंजुर दराच्या दुप्पट दराने आकारणेत येईल.

1. कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा यांना खालील परिस्थितीत नळजोड खंडीत करण्याचे अधिकार राहतील.

1. विहीत मुदतीत पाणीपट्टी भरणा न झालेस

2. नळजोडास मीटर नसल्याचे किंवा असलेला मिटर नादुरुस्त असल्याचे निदर्शनास आलेस

3. मनपाने ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा पाण्याचा अतिरिक्त वापर झालेस तरी मुख्य कार्यकारी अधिकारी, कॅन्टोमेंट बोर्ड देहुरोड यांचे नावे पाण्याच्या

नळजोडाचा व्यास ६" मंजुर करणे व घरगुती वापरासाठी पाण्याचा दर हा प्रती युनिट (हजार लिटर) र.रु.१६.५४ तसेच एकुण पाण्यापैकी ५ टक्के पाण्याचा वापर व्यापारी गृहित धरून त्यासाठीचा प्रति युनिट दर (हजार लिटर) र.रु.५५.१३ आकारणेकामी तसेच या दरामध्ये दरवर्षी ५ टक्के वाढ करणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषयातील घरगुती वापरासाठी पाण्याचा दर हा प्रतियुनिट (हजार लि) र.रू.१०/- इतका आकारण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६२२ विषय क्रमांक -५

दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.आयुक्त

संदर्भ–१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र .कर/मुख्य/९/कावि/२०/२०२१, दि.१५/०१/२०२१

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८६२३ दि.२६/०२/२०२१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 127 व 128 मधील तरतूदीनुसार कर संकलन विभागामार्फत शहरातील इमारती व जमिनींवर कर आकारणी करणेत येते. कर संकलन मुख्य कार्यालयाअंतर्गत 16 विभागीय कार्यालयामार्फत 8 क्षेत्रिय कार्यालयांचे नियंत्रणात कर आकारणी विषयक कामकाज करणेत येत आहे. अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 8 कराधान नियम मधील नियम 5 मध्ये मिळकतधारकाने नवीन/ वाढीव बांधकाम केल्यास बांधकाम पूर्ण झाल्याचे 15 दिवसाच्या आत आयुक्तास लेखी नोटीस देणेची तरतूद आहे. त्यानुसार मिळकतधारक यांचेकडून प्राप्त झालेली लेखी नोटीस अथवा करसंकलन विभागाकडील गट प्रमुख यांना निरंतर तपासणी व सर्व्हेक्षणात आढळून येणा-या मिळकतींवर कर आकारणी करणेत येते. मिळकतीची कर आकारणी करतेवेळी मिळकतीचा वापर (निवासी/ बिगरनिवासी /इत्यादी), बांधकाम दर्जा, मिळकतीचा प्रत्यक्ष वापर सुरु केल्याचा दिनांक (आकारणी दिनांक) व एकूण क्षेत्रफळ विचारात घेऊन कर आकारणी करणेत येते. अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 8 कराधान नियम मधील नियम 7 मधील तरतूदीनुसार निश्चित केलेल्या प्रती चौरस फूट करयोग्यमूल्य

दराने विशेष नोटीस मिळकतधारकास बजाविण्यात येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 8 कराधान नियम मधील नियम 7 मधील तरतूदीनुसार मा.आयुक्त सो यांना [मिळकतीचा वापर (निवासी/बिगरनिवासी/ इत्यादी), बांधकाम दर्जा या बाबी विचारात घेऊन] प्रती चौरस फूटाचे करयोग्य मूल्य दर ठरविण्याचे अधिकार आहेत. त्यानुसार सन 1990-1991, 1992-1993, 2002-2003, 2006-2007, 2008-2009, 2009-2010, 2010-2011, 2011-2012, 2012-2013, 2013-2014व अंतिमत: 2015-2016 या आर्थिक वर्षामध्ये करयोग्य मूल्याचे प्रती चौरस फूट दरात वाढ करण्यात आलेली आहे. ज्या आर्थिक वर्षामध्ये करयोग्यमूल्याचे प्रती चौरस फूट दरामध्ये वाढ करण्यात आली आहे, त्यापुढील कालावधीत आढळून आलेल्या मिळकतींनाच सदर दर लागू करण्यात आलेले आहेत. त्यापूर्वी आकारणी झालेल्या मिळकतींना करयोग्यमूल्याचे बदल केलेल्या दरानुसार कर आकारणी करणेत आलेली नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 8नियम 20मधील तरतूदीनुसार (20(1)(क) – कोणत्याही करयोग्यमूल्याची आणि त्यावर आधारलेल्या आकारणीची रक्कम वाढवून किंवा कमी करुन) जुन्या मिळकतींचे करयोग्यमूल्यामध्ये दुरुस्तीची तरतूद आहे. त्यामुळे जुन्या व नवीन मिळकतींचे करयोग्यमूल्य व बिलामध्ये मोठ्या प्रमाणात असलेली तफावत कमी करुन त्यामध्ये सुसूत्रता येणे आवश्यक असल्याने खालील नमूद केलेनुसार कार्यवाही करणेत येत आहे.

1. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 8 नियम 7(1) मधील तरतूदीनुसार महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील मिळकतींवर मिळकतीचे करयोग्य मुल्य निश्चित करणेकामी करयोग्य मूल्याच्या वार्षिक भाडे दरातून 10% सूट वजा जाता करयोग्य मूल्याचे प्रती चौरस फुट दर लागू करणेची तरतूद आहे.

2. महाराष्ट्र शासनाचे प्रचलित रेडीरेकनरनुसार मागील वर्षाच्या वार्षिक मूल्य दरात यावर्षी साधारणत: 0 ते 10% वाढ झालेली आहे.

3. सध्या नवीन मिळकतींचे व जुन्या मिळकतींचे कर आकारणीनुसार बिलामधील मोठ्या प्रमाणात येणारी तफावत कमी करणे आवश्यक आहे. परंतु जुन्या मिळकतींना आज रोजीच्या म्हणजेच सन 2020-2021 या आर्थिक वर्षाचे दर लागू केले असता, करयोग्य मुल्यात खूप मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. सबब जुन्या मिळकतींच्या करयोग्य मुल्य दरात अचानक खूप मोठ्या प्रमाणात वाढ होऊ नये म्हणून त्याचे पुनर्मुल्यांकन करणेकामी सन 2021-2022 या आर्थिक वर्षाचे

प्रती चौरस फूट दराचे 50% म्हणजेच निम्मा दर लागू करणेत येत आहे. तसेच जुन्या आकारणी झालेल्या मिळकतींचे करयोग्यमुल्य दरात मोठ्या प्रमाणात वाढ न होण्याचे दृष्टीने सन 2020-2021 करिता महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द केलेल्या रेडी रेकनरमधील मिळकतींचे वयोमानानुसार घसारा काढणेकामी वापरण्यात येणारी टक्केवारी विचारात घेणेत येत आहे. (उदा. 0 ते 2 वर्षे घसारा – 0%, 3 ते 5 वर्ष घसारा – 5%, ….. 21 ते 30 वर्ष घसारा – 30%) परंतु जुन्या मिळकतींना अशा प्रकारे पुनर्मुल्यांकन केले असता, सन 2005-2006 नंतरच्या मिळकतींच्या करयोग्य मुल्यात (-) उणे वाढ होत असल्यामुळे केवळ सन 2005-2006 पूर्वीच्या सर्व जुन्या मिळकतींच्या करयोग्यमुल्याच्या दराचे पुनर्मुल्यांकन वरील प्रमाणे करण्यात येत आहे व सन 2006-2007 व 2006-2007 पासून पुढील सर्व मिळकतींचे पुनर्मुल्यांकन करताना त्या त्या वर्षीच्या करयोग्यमुल्य दरामध्ये घसारा न देता सरसकट 5 टक्के दरवाढ करून करण्यात येत आहे.

4. सन 2021-2022 या आर्थिक वर्षापासून म्हणजेच दिनांक 01 एप्रिल 2021 पासून वरील प्रस्तावानुसार अंमलबजावणी करणेत येत आहे.

5. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 8 नियम 20(2) मध्ये नमूद केलेनुसार नियम 15(2) प्रमाणे सर्व संबंधितांना तक्रार/ हरकत घेणेकामी 21 दिवसापर्यंतची लेखी विशेष नोटीस देय राहील.

6. विहित मुदतीत तक्रार/हरकत प्राप्त झाल्यास नियम 16, 17 व 18 नुसार कार्यवाही करणे. तक्रार निकालात काढलेनंतर दिलेल्या निर्णयानुसार व ज्या मिळकतधारकांनी तक्रार/हरकत दाखल केलेली नाही अशा मिळकतींचे प्रकरणी आवश्यक ती अंतिम कार्यवाही (नियम 18) करुन कर आकारणीची नोंद आकारणी पुस्तकात (असेसमेंट रजिस्टरला) घेऊन मिळकत कर संगणक प्रणालीमध्ये नोंदी घेणेत येईल.

7. अशा सर्व मिळकतधारकांच्या करयोग्यमूल्याचा टप्पा विचारात घेऊन मा.महापालिका सभेने निश्चित केलेल्या दरानुसार कराचे बिल तयार करणे व संबंधितांना बजाविणेची कार्यवाही करणेत येईल.

8. वरील प्रमाणे पुनर्मुल्यांकन तक्ता सोबत सादर केलेला आहे.

सन 2021-2022 या वर्षाकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 8 नियम 7 चे तरतूदीनुसार सन 2021-2022 पासून करयोग्य मूल्याचे प्रति चौरस फुट दरामध्ये वाढ करणे व प्रकरण 8 नियम 20 मधील तरतूदीनुसार सन 2021-2022 पासून जुन्या मिळकतींचे करयोग्यमूल्याचे पुनर्मुल्यांकन करणेकामी मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, पिंपरी चिंचवड शहरामध्ये कोविड महामारीमुळे नागरिकांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे. या बाबीचा विचार करता मनपा हद्दीतील मिळकतींच्या करयोग्य मुल्यात वाढ करणे नागरिकांवर अन्यायकारक ठरेल. यास्तव महापालिका हद्दीतील कोणत्याही मिळकतींच्या करयोग्य मुल्यात कोणत्याही प्रकारची दरवाढ करण्यात येऊ नये. पुर्वीप्रमाणेच करआकारणी चालू ठेवणेस व सदर प्रस्ताव दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.राहुल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक नगरसेविका. वास्तविक हा विषय दप्तरी दाखल करण्यासाठी महासभेकडे आला आहे. परंतु आपण जर त्याची माहीती घेतलीतर ऑलरेडी आपण या नवीन वाढीव दराप्रमाणे बील दयायला सुरवात केली आहे याची अंमलबजावणी झालेली आहे. एकतर्फी वाढीव दराची करआकारणी ऑलरेडी शहरातील नागरीकांना लावण्यात आलेली आहे. हा प्रस्ताव हार्डीकर साहेबांना केला मी याच, पक्षनेते याच्यावर आपलही लक्ष नव्हत हा ठराव झाला याची अंमलबजावणीही झाली आणि आज दप्तरी दाखल करायचा म्हणजे कुठेतरी शासनाकडे पाठवतो आणि तुम्ही करुन आणा हे जरी मगाशी तुम्ही म्हणल ना त्या पध्दतीने कुठेतरी नागरींकांना फसवणूक करायची म्हणून हा ठराव महासभेपुढे आला आहे. परंतु याची ऑलरेडी अंमलबजावणी झालेली आहे. वाढीव बील ही नागरीकांना गेलेली आहेत असं असताना तुम्ही एकतर हे करुन दयायला नव्हत पाहीजे. हे करत असताना तुमच लक्ष कुठ होत याच पण तुम्ही उत्तर सभागृहाला दया. अशाप्रकारे कर वाढ करण्यास आमचा विरोधच आहे आणि विरोधच राहणार आहे. सध्याच्या कोरोना परिस्थितीत लोकांची आर्थीक परिस्थिती पाहीली हे असताना तुम्ही याची अंमलबजावणी सुरु केली. आमचा याला विरोध आहे. तरी माई याची आम्हांला स्पष्टता हावी आहे. याची अंमलबजावणी सुरु झाली का व्हायची का होणार नाही हे सांगाव मला परत याच्यावर बोलायच आहे.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक नगरसेविका. जुन्या मिळकतीना करवाढ करण्याच्या संदर्भामध्ये हा विषय या ठिकाणी आलेला आहे. अगोदरच्या कार्यपत्रीकेमध्ये एक विषय होता त्यात आपण सांगीतल की आपण कुठल्याही प्रकारच्या करामध्ये आपण वाढ केलेली नाही. स्थायी समितीला सुध्दा आपण तशाप्रकारची उपसूचना दिली आहे. मला असं वाटत की कुठल्याही मिळकतीना करयोग्य मुल्यत वाढ करणे नागरीकांवर अन्यायकारक ठरेल. कोरोनाच्या महामारीत मोठया प्रमाणावर नुकसान झालेल असल्यामुळे यास्तव महापालिकेनी कोणत्याही मिळकतीच्या करयोग्यमुल्यात, कोणत्याही प्रकारची दरवाढ करण्यात येवू नये, म्हणजे राहूल कलाटेंनी जे सांगीतल की आमचा विरोध आहे, आपलाही विरोध आहे, आपण मगाशी याच्यामध्ये म्हणलेचना की आम्हांला कुठल्याही प्रॉपर्टीला याच्यामध्ये करवाढ नको आणि या जुन्या मिळकती आहेत यांनातर बिलकूल नको. आपण जुन्या मिळकतीना कुठल्याही प्रकारे करवाढ करु नये. याच्यामध्ये म्हणलेल आहे की पुर्वीप्रमाणेच करआकारणी चालू ठेवण्यास व सदर प्रस्ताव दप्तरी दाखल करणेस म्हणजे पुर्वीप्रमाणेच जी काही करआकारणी आहे तीच चालु ठेवण्यात यावी म्हणून हा विषय दप्तरी दाखल करण्यासंदर्भात याठिकाणी आलेला आहे. जुन्या आणि नवीन मिळकतीमध्ये ब-याच प्रमाणामध्ये करयोग्य मुल्यामध्ये बरेच अंतर पडलेल असताना सुध्दा आता या परिस्थितीला कोरोनाच्या काळामध्ये आपल्याला नागरीकांना आधिकचा भार देणं योग्य ठरणार नसल्यामुळे आपण हा विषय याठिकाणी दप्तरी दाखल करण्याचा आहे म्हणजे कुठल्याही मिळकतीना कुठलाही वाढीव कर लागू करु नये अशा संदर्भातला हा विषय आहे त्यामुळे मा.महापौर साहेब हा विषय दप्तरी दाखल करण्यासाठी आपण मंजूर करावा अशी मी याठिकाणी विनंती करतो.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक नगरसेविका. याठिकाणी पक्षनेत्यांनी खुलासा केलेला आहे तो खुलासा लोकांची दिशाभूल करणारा आहे, फसवणारा आहे. वास्तविक पाहता हार्डीकर साहेब असताना मोठमोठे टेंडर या शहरातले केले गेले मग त्यामध्ये काय अटि पाहीजेत काय शर्ती पाहीजेत या सगळया गोष्टी ऍण्टीचेंबर मध्ये चालायच्या मात्र हा विषय स्थायी समितीमध्ये येण्याच्या आदि ज्यावेळेला आयुक्तांनी हा निर्णय घेतला त्यावेळेला गटनेते असतील, मा.महापौर आपण स्वत: असाल, तुमच्या पक्षाचे प्रमुख असतील या लोकांनी खर पाहता आयुक्तांना विश्वासात घेवून अशाप्रकारची वाढ करुच नका आणि विषय आणू नका अस म्हणल पाहीजेल

होतं. वास्तविक पाहता हा अधिकार आयुक्तांचा आहे आणि त्यांच्या अधिकारात त्यांनी त्याची सुरवात सुध्दा केलेली आहे तस राहूलनी सांगीतलेल आहे. तुमच जर म्हणण अस असेल की जुन्या मिळकतीचा दर वाढणार  नाहीतर सभागृह नेत्यांनी मला लेखी दयाव आणि तस सांगाव की जुन्या घरांचा दर वाढणार नाही, टॅक्स वाढणार नाही याची हामी दयावी भारतीय जनता पार्टीनी आणि तस जर खोट ठरलतर त्याला जबाबदार कोण असणार भारतीय जनता पार्टी.  मा.महापौर साहेब तुम्ही प्रशासनाकडन खुलासा घ्या, तुम्ही करसंकलन विभागाला विचारा की त्यांनी याची अंमलबजावणी केली आहे का आणि जनरल बॉडीमध्ये आता लोकांच्या सहानुभूतीमुळे तुम्ही असा फसवा निर्णय घेत असाल की आम्ही रद्द करतो हे फसवायच काम चालल आहे, वास्तविक पाहता टेंडरच जस गॉटमेळ होतं तस हे गॉटमेळ झालना नागरीकांसाठी. याची नागरीकांसाठी आयुक्तांकडून खात्री का करुन घेतली नाही. अजूनही माझ म्हणण आहे की आपण करसंकलन विभागाच्या प्रमुखाना विचारा की ही करवाढ होणार आहे का नाही.

**मा.राहुल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक नगरसेविका. पक्षनेत्यांनी सांगीतल की एक रुपयाचीही करवाढ झाली नाही आणि आम्ही केली नाही. ज्या पध्दतीने योगेशजी बहलनी सांगीतल की तुम्ही हार्डीकर साहेबांना अक्षरश: थांबवायला पाहीजे होतं. ज्या जुन्या मिळकतींचा टॅक्स हा वर्षाला १०० रुपये होणार होताना तो आता तीनशे रुपये होणार आहे. तुम्ही आता त्याला रेडीरेकनरशी लिंक केल सगळया शहराला समान केल. म्हणजे ज्याचा जुना मिळकतकर १०० रु. होता तो आता ३०० रु. झाला आहे नामदेवराव एकतर तुम्ही हा विषय बघा आणि तुम्ही आता जे बोललात त्याच्यावर ठाम राहा. आयुक्तांना तुम्ही करुन नव्हता दयायचा आणि करुन दिल्यानंतर तुम्ही राज्यशासनाकडे पाठवणार. तुम्ही मागापासून सांगता शास्तीच आम्ही केल, आम्ही केल, आम्ही केल त्या पध्दतीन आम्ही तुम्हांला सांगतो की तुम्ही वाढवलेला हा दर आहे. १०० रु. चे ३०० रु. झालेत. कोरोना चालू आहे लोकांची आर्थीक परिस्थिती खराब आहे असं असताना तुम्हांला स्वप्न पडल की शहराच्या एका भागात लोक कमी भरतात एका भागात जास्त भरतात म्हणून सगळया शहराला समान करण्यासाठी तुम्ही कुठ रेडीरेकनर लॉगींक केल कुठ काय केल आम्ही देखील हार्डीकर साहेबांना म्हणल होत साहेब, हे करु नका. आमच्या भागात दोन-दोन हजार रुपये रेडीरेकनर आहे चिखलीच्या भागात पाचशे-पाचशे रुपये आहे. अस असताना तुम्ही जर या पध्दतीने दरवाढ केली, ही दरवाढ भारतीय जनता पार्टीने शहरातील नागरीकांवर लादली असा आमचा ठोस आरोप आहे, तुम्ही दुस-यासाठी डायरेक्ट

आयुक्तांकडे जाता या टेंडरवर सही करा या अटी शर्ती बदला, ते करा हे सर्व होत असताना तुमच त्याकडे लक्ष का नव्हतं याच उत्तर देखील नामदेवरावानी आज सभागृहात दयाव.

**मा.राजू मिसाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक नगरसेविका. मा.महापौर साहेब, तुम्हांला खरच या शहरातील नागरीकांचा जर कळवळा असेलतर आणि या कोरोनाच्या काळामध्ये तुम्ही, हार्डीकर साहेबांनी त्यावेळी ही दरवाढ वाढवली, आमची पहील्यांदा विनंती आहे की आम्हांला झगडे मॅडमकडन एक खुलासा हवा आहे. हे तुम्ही नागरीकांना दाखवण्यासाठी हा विषय दसरी दाखल होतो. योगेश भाईनी, राहूल कलाटेनी जी काही सुचना मांडली की आता जो काही तो वाढीव कर चालू झाला तो मॅडमनी लागू केला आहे का त्याचा पहील्यांदा खुलासा करावा.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक नगरसेविका. जो आरोप याठिकाणी भारतीय जनता पार्टी, भारतीय जनता पार्टी असं केला जातय तर आपल्या सगळया सन्माननीयांना माहीती आहे की हा विषय काय आहे कुठल्या कलमाच्या अंतर्गत त्यानी त्यांच्या अधिकारामध्ये केलाय ते त्याच्यामध्ये म्हणल आहे, करयोग्य मुल्यांचे पुर्नरमुल्यांकन करण्यासाठी मा.आयुक्त यांची मागणी असलीतरी, या सभागृहामध्ये म्हणून तर विषय आणला आहेना आणि म्हणून सभागृहामध्ये विषय आणत असताना आम्ही म्हणलो की कुठल्याही जुन्या मिळकतीच्या करयोग्यमुल्यामध्ये कुठल्याही प्रॉपर्टीला करु नये अशा संदर्भामध्ये पुर्वीप्रमाणेच करा. मी वारंवार सांगतो जरी त्यांनी लावलातरी आम्ही त्यांना ते लावू देणार नाहीत.

**मा.झगडे (करसंकलन प्रमुख) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक नगरसेविका. महानगरपालिका अधिनियम कलम प्रकरण ८ कराधान त्यातल ७ आणि २० या कलमानुसार करयोग्य मुल्य कमी करणे किंवा वाढविणे हे मा.आयुक्तांच्या अधिकारामध्ये याची अंमलबजावणी होणार आहे आणि आजचा जो विषय मा.महापालिका सभेसमोर आलेला आहे तो अवलोकनार्थ विषय आलेला आहे. यामध्ये शहरात जी करवाढ वेळोवेळी करण्यात आली तर सगळयात शेवटची करवाढ ही २०१३-१४ ला करण्यात आलेली आहे त्याच्यानंतर करवाढ करण्यात आलेली नाही. हा जो प्रस्ताव आलेला आहे तो ज्या शहरामध्ये जुन्या मिळकती आहेत त्यांना आतापर्यंत जी वेळोवेळी

करवाढ करण्यात आलेली ती करण्यात आलेली नव्हती म्हणून त्यांच्या दरामध्ये जी तफावत आहे ती आज रोजी जे दर नवीन मिळकतीना लागलेले आहेत आणि जुन्या मिळकतीना लागलेले याच्यामध्ये खुप मोठी तफावत आहे. उदा. आजरोजी रेसेडेन्शिअल प्रॉपर्टीचा ए झोन आहे ५०० स्क्वे.फुटला ३० रुपये पर स्क्वे. फुट आज रोजी दर आहे पण तो ९०-९१ च्या प्रॉपर्टीला ५.४० रु. आहे. तर ही ३० रु.आणि ५.४० रु. ही तफावत खुप आहे. आज सुध्दा २००५ पर्यंत साधारण तो रेट हा ८.६४ रु. आहे आणि आज आहे तो ३० रु. आहे. तरी ही तफावत दुर करण्यासाठी त्या जुन्या मिळकतीना अतीशय नॉमीनल प्रमाणामध्ये ती दरवाढ सुचवलेली आहे. म्हणजे ५०० स्क्वे.फुटचा ऐरीया घेतलातर त्यामध्ये वर्षाला ८७०/- रु. एकुण वर्षाला आकारणीमध्ये वाढ होते. म्हणजे हे कॅलक्यूलेशन गृहीत धरताना आपण आजचा जो दर आहे ३०/- रु. तो जुन्या मिळकतीना त्याच्या अर्धा केला म्हणजे १५/- रु. केला आणि जुन्या मिळकतीना त्याचा दुसरा पण पकडला म्हणजे साधारणत: ७० टक्के घसारा हा १९९० सालच्या प्रॉपर्टीला पकडला आणि याचा जो बेस आहे तो रेडीरेकनेर प्रमाणे घेतला आहे. जो घसारा पकडला आहे तो रेडीरेकनेरमध्ये जसा दिला म्हणजे दहा वर्षाची मिळकत असेलतर किती घसारा पकडणे आवश्यक आहे म्हणजे खरेदी विक्रीचे जे व्यवहार होतात त्याच्यामध्ये जो जुन्या मिळकतीना घसारा पकडला जातो तोच बेस आपण इथे घेतलेला आहे. ए झोनच उदाहरण घेतलतर ५०० स्क्वे.मी.च्या घराला पुर्वीचा जो कर आहे तो ६७३७/- रु. येत होता आणि १९९० सालच्या प्रॉपर्टीला तो १०८०/- रु. येत होता. २००० सालच्या प्रॉपर्टीला १३२८/- रु. ५०० स्क्वे.फु.ची प्रॉपर्टी आज रोजी ती प्रॉपर्टी जर २००० सालची असेल, म्हणजे त्या काळी आकारणी केली असेलतर तीला १३२८/- रु. कराचा दर आहे म्हणजे करयोग्य मुल्य पुर्ण १३२८/- रु. येतं. त्याच क्षेत्रफळाच्या आजरोजीच्या प्रॉपर्टीला ते ६७३७/- रु. येतं. आता वर्षाला १३१४/- रु. वाढेल वर्षाला, म्हणजे २६००/- होइल. म्हणजे हा रेट त्याला कायमस्वरुपी याच्यापुढील राहील. पण जी शंभर टक्के, टक्क्यामध्ये वाढ केलीतर ती जास्त दिसते पण रक्कमेमध्ये वाढ केलीतर ती केवळ १३२६/- रु. पुर्ण वर्षाला वाढतात. हा तत्कालीन आयुक्त मा. हार्डीकर सरांनी निर्णय घेतलेला आहे आणि तो १ एप्रिल पासून लागू करण्याचे आदेश दिलेले आहेत.

**मा.महापौर -** हा विषय क्र.५ मंजूर करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- ६

दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.भूजि/६/कावि/५००/२०२१, दि.१८/०२/२०२१

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८७०६ दि.२६/०२/२०२१

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या ताफ्यात सद्या सुमारे २१०० बसेस आहेत. तसेच भविष्यात ताफ्यात नव्याने बसेस दाखल होणार आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत ६ जागांचा ताबा पुणे महानगर परिवहन महामंडळास देण्यात आलेला आहे आणि ८ जागा देणेबाबत प्रस्तावित आहे. तरी पुणे महानगर परिवहन महामंडळाने नमुद केलेल्या जागांमध्ये त्यांना डिझेल/सीएनजी व इलेक्ट्रीक चार्जींग व्यवस्था करणेकामी नाहरकत प्रमाणपत्र देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच विभागीय कार्यालय स्वारगेटचे उपविभागीय कार्यालय, अंतर्गत विवीध विभाग पिं.चिं.मनपा मध्ये त्वरीत कार्यान्वित करावे, म्हणजे दैनंदिन निर्णय पिं.चिं.महानगरपालिकेच्या अखत्यारित करण्यात येतील व फक्त धोरणात्मक निर्णयासाठी विभागीय कार्यालयामार्फत घेण्यात येतील यास मान्यता देणेत यावी.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक नगरसेविका. याठिकाणी चार्जींग स्टेशनचा विषय आला. आजपर्यंत त्यांना आपण सहा जागा दिल्यात आठ जागा ताब्यात मागतात. या अनुषंगाने या सभागृहाला सांगू इच्छिते की पीएमपीएमएलला जागा दयायची का नाही दयायची हा सगळा विषय एका बाजूला खरा असला आणि आपण मंजूरही केला पाहीजे का तर उदयाची आपल्या शहराची ती गरज आहे म्हणून. परंतु महत्वाची बाब म्हणजे या पीएमपीएमएल वाल्यांचा जो मुजोरपणा या शहरात चालू आहे त्याच्यावर कुठेतरी विचार झालाच पाहीजे. आज पीएमपीएमएलच्या कमिटीमध्ये तुम्ही आहात, मा.आयुक्त साहेब आहेत, स्थायी समितीचे चेअरमन

असतात परंतु कधीच या पिंपरी चिंचवड शहराला न्याय मिळत नाही. मा.महापौर साहेब, आमची कासारवाडी दोन भागात वाटलेली आहे कासारवाडीचा वरचा भाग आणि खालचा भाग, माझ्या खालच्या भागातील लोकांना एक कि.मी. वर जाव लागत हायवेला जायच असेलतर किंवा नाहीतर आम्हांला दुसरा पर्याय पिंपळेगुरवला. आज कुठेतरी आपण स्मार्ट सिटीकडे जातोत, स्मार्ट सिटीकडे वाटचाल करतो आणि आशा काळामध्ये दिड ते दोन कि.मी.माझ्या प्रभागातील नागरीकांना पायपीट करावी लागते, शेअरींगची रिक्षा करावी लागते, घरामध्ये जी काही पुरुष मंडळी असतील त्यांच्याकडन गाडी घ्यावी लागते आणि गाडीवरतीच बसस्टॉपवर जाव लागतं. मा.महापौर साहेब, त्या अनुषंगाने मी पीएमपीएमएलला मागे दिड ते दोन महीन्यापुर्वी एक पत्र दिल होतं तीथे झेंडे म्हणून आहेत त्यांना पाच ते सहा फोन केले उचलतच नाहीत, रिप्लायपण नाही, इनमिटींग असा मॅसेज पण नाही म्हणजे इतके काय आपण मोकळे आहोत का की आपण घरच्या गप्पा मारतो, यांची काही वैयक्तीक माहीती विचारतो. आपण ज्यावेळेला एखादया अधिका-याला फोन करतो त्या मागच एक कारण असतं की या शहरातील नागरीकांचे प्रश्न असेल किंवा माझ्या प्रभागातील नागरीकांसाठी मी प्रश्न विचारण्यासाठी केलेला फोन असतो. हार्डीकर साहेबांची याठिकाणी अगदी अवर्जून आठवण होते किंवा सगळयाच सन्मा.आयुक्तंची आठवण होते की आपण फोन केला निश्चितपणे ते अधिकारी आहेत मिटींगमध्ये असतात, बिझी असतात म्हणजे आम्ही रिकामटेकडे अजीबात नाहीत. नंतर फोन केला आणि बोला, बोला, पटकन बोला काय काम होतं. आम्ही पाच-पाच, सहा-सहा फोन करायचे तुम्ही टाकाना मॅसेज पहील्याच फोनला मी मिटींगमध्ये आहे नंतर कॉल करतो. नंतर तुम्ही एकजरी फोन केलातरी आम्ही समजू शकतो. परवा दिवशी मी आयुक्त साहेबांना फोन केला तीन वाजता फोन केला मी दोन फोन केले मी बंद केला. ठिक आहे म्हणले एक दोन तासानी रिप्लाय येईल जाऊ देत नवीन आयुक्त आहेत करतील आपल्याला मॅसेज तरी करतील किंवा फोन तरी करतील. शेवटी संध्याकाळी सहा वाजता मी फोन केला आणि सात फोन केले नंतर घरात पोहचत होती त्यावेळेस त्यांचा फोन आला. तसच पीएमपीएमएलला आपण कोटयावधी रुपये मोजतो. झेंडे साहेबांना सहा फोन केले कसलाच रिप्लाय नाही मी म्हणल ठिक आहे की आपण नवीन आहोत त्यांना माहीत नसेल नगरसेवकांचा नंबर आहे आपण त्यांना एक मॅसेज टाकला त्या कॉलचा स्क्रीनशॉट पण आहे. सर, प्लीज कॉल मी आयएॅम नगरसेवीका, आशा शेंडगे असं त्यावर टाकल तरी साहेबांचा काही रिप्लाय नाही. पुन्हा दोन तास वाट बघीतली मग त्यांना सांगीतल की साहेब आहो, ते म्हणाले की ताई मी बिझी आहे, मी एका सुनावणीत आहे. मी म्हणले हरकत नाही साहेब तुम्ही बिझी आहात मी पण काही रिकामटेकडी

नाही. त्यांनी मला सांगीतल की मी एक मेल टाकतो त्या मेलवर एक उत्तर दिल उत्तर इतक भयानक आहे. मी सांगीतल होत की भोसरीतून जाणारी बस जी आहे ती कासारवाडीच्या लूपमधुन खाली घ्या जेणेकरुन माझ्या कासारवाडीतल्या नागरीकांची बसची व्यवस्था होईल त्यांच पायपीट वाचेल हा एक दृष्टिकोन असलातरी पीएमपीएमएलच उत्पन्न भरपूर वाढणार आहे. कारण माझ्याकडे रेल्वेस्टेशन आहे, उदया येणार मेट्रोस्टेशन आहे आणि आजची कासारवाडीतली लोकसंख्या जर पाहीलीतर ती किमान पाच लाखाच्या आसपास असेल. त्यांच्याकडून उत्तर काय आल मला की, त्या लूपवरुन गाडी काढण अत्यंत धोकादायक आहे, नागरीकांच्या जीवाशी खेळ होईल आणि म्हणून आम्ही तीथून बस खाली उतरु शकत नाहीत. तुमच्याकडे फार तर आम्ही दोन बस चालू करतो. दोन बस चालू करुन आमच्या वॉर्डातील नागरीकांची आपण बोळवण करतो का असा विषय आहे. जर त्या बसची फ्रिक्वेन्सी राहीलीतर ख-या अर्थाने त्या बसचा उपयोग नागरीकांना होईल. मग हे कोणत्या पध्दतीने असे उत्तर देतात. मग साध टेक्निकली उत्तर त्यांनी दयायला पाहीजे होतं की तुमच्या इथल जे टर्निंग बसरुटच आहे ते आमच्या बसला लायबल नाही. मी आपल्या बीआरटीच्या लोकांना विचारणा केली ते म्हणाले तो हायवेचा लुप आहे त्या प्रकारे बांधणी केली ते आपण सेफ केलेली आहे. मग अशाप्रकारच बेजबाबदार उत्तर देण्या-या अधिका-यांच आपण काय केल पाहीजे आणि काय म्हणून आपण पीएमपीएमएलच्या लोकांचा लाड करतो. आपण ६०-४० चा रेश्यो केलेला आहे हे आपल्याला माहीती आहे. आता साधारणत: १६६४ बसेस रुटवर आहेत. १६६४ बसेस पैकी फक्त ४३० बसेस या पिंपरी चिंचवड शहराच्या वाटयाला येतात. असं  का हो पैसे देताना बरोबर ६०-४० चा रेश्यो, तुमचा बोनस देताना ६०-४० चा रेश्यो. कर्मचारी हे शहराचे नागरीक आहेत त्यांना आपण देणं लागतो त्यामुळ अजीबात दुमत नाही. मग इतर ठिकाणी सावत्रपणाची भूमीका का. १६६४ म्हणल आणि जर आपण ६०-४० चा रेश्यो घेतलातरी ८५० बसेस असल्या पाहीजेत त्यात फक्त २० टक्के बसेस ते आपल्याला देतात. आपण तीथ गेल्यानंतर याला वाचा का फोडत नाहीत आपण का सांगत नाहीत की आम्हांला ४० टक्के बसेस जर दिल्यातर आमच्याकडून पैसे घ्यायला या नाहीतर येवूच नका. मला वाटत मागच्यावेळेस सभागृहात खुप ओरड झाली म्हणून ते लोक आपल्या सभागृतील मिटींगला येतात. परंतु प्रत्येकवेळी नवा गडी नवा राज्य. त्यामुळे जो अधिकारी आलेले असतात त्यांना त्या विषयाची माहीती नसते. मग पुन्हा नवीन माणस येतात ते फक्त ऐकण्याच काम करतात आपण सगळेजण इथ बडबड सभागृहात करतो अशी भूमीका आहे. त्याचबरोबर असिस्टंट डेपो मॅनेजर हे नवीन पदाची निवीदा प्रक्रीया राबवतात व पद भरती करतात. असिस्टंट डेपो मॅनेजर हे

त्याठिकाणी वाहतूक शाखेच पद आहे परंतु त्यांनी सगळे नियम धाब्यावर बसवले आणि त्यांचे सोईनी जुने अधिकारी आले पाहीजेत, संबंधित अधिकारी आले पाहीजेत अशी व्यवस्था केलेली आहे. अगदी खुप टेक्निकली गोष्टी सांगीतल्यातर क्लार्क पदावरती असणारा माणूस, ड्रायव्हर पदावरती असणारा माणूस सुध्दा सहा.प्रशासन अधिकारी त्याठिकाणी होवू शकतो. म्हणजे आपण सगळे हे डोळे बंद करुन बसणार आहेत का. आपल्या शहरातील नागरीकांना आपल्याला न्याय दयायचा नाही का. या सगळया बाबी एका बाजूला असताना सगळयात महत्वाची बाब म्हणजे आपण यांना का सांगत नाहीत आम्हांला बस पाहीजे. मी कुणाला फोन करायचा, त्यांच्या पुण्यातल्या अधिका-यांना फोन करायचा, काय संबंध आहे. का इथे एखादा सक्षम अधिकारी पीएमपीएमएलचा बसत नाही. की जो येथे येईल बसेल व आमच ऐकेल आणि निर्णय घेईल. मा.महापौर साहेब, याठिकाणी एक महत्वाची विनंती करते की जे विभागीय कार्यालय पुण्यामध्ये आहे त्याचा उपविभाग म्हणून आपल्या इथ तीन अधिकारी बसतात ते सगळे अधिकार इथे जे काही सक्षम आहेत त्यांना दिले पाहीजेत आणि दैनंदिन निर्णय जे आहेत ते याच लोखंडे सभागृहात घेतले पाहीजे. फक्त धोरणात्मक निर्णयासाठी आपण पुण्याकडे गेल पाहीजे.

मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- विभागीय कार्यालय स्वारगेटचे उपविभागीय कार्यालय, अंतर्गत विवीध विभाग पिं.चिं.मनपा मध्ये त्वरीत कार्यान्वित करावे, म्हणजे दैनंदिन निर्णय पिं.चिं.महानगरपालिकेच्या अखत्यारित करण्यात येतील व फक्त धोरणात्मक निर्णयासाठी विभागीय कार्यालयामार्फत घेण्यात येतील यास मान्यता देणेत यावी.

**मा.सिमा सावळे –** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेसह दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक - ६२३ | विषय क्रमांक- ६ |
| दिनांक- १८/३/२०२१ | खाते- मा.आयुक्त |

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.भूजि/६/कावि/५००/२०२१, दि.१८/०२/२०२१
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८७०६ दि.२६/०२/२०२१

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या ताफ्यात सद्या सुमारे २१०० बसेस आहेत. तसेच भविष्यात ताफ्यात नव्याने बसेस दाखल होणार आहेत. पिंपरी चिंचवड

महानगरपालिकेमार्फत ६ जागांचा ताबा पुणे महानगर परिवहन महामंडळास देण्यात आलेला आहे आणि ८ जागा देणेबाबत प्रस्तावित आहे. तरी पुणे महानगर परिवहन महामंडळाने नमुद केलेल्या जागांमध्ये त्यांना डिझेल/सीएनजी व इलेक्ट्रीक चार्जींग व्यवस्था करणेकामी नाहरकत प्रमाणपत्र देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच विभागीय कार्यालय स्वारगेटचे उपविभागीय कार्यालय, अंतर्गत विवीध विभाग पिं.चिं.मनपा मध्ये त्वरीत कार्यान्वित करावे, म्हणजे दैनंदिन निर्णय पिं.चिं.महानगरपालिकेच्या अखत्यारित करण्यात येतील व फक्त धोरणात्मक निर्णयासाठी विभागीय कार्यालयामार्फत घेण्यात येतील यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे विषय मांडतो.

ठराव क्रमांक - ६२४ विषय क्रमांक- ७
दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/BRTS/३११/२०२१, दि.२६/०२/२०२१
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८९०० दि.२६/०२/२०२१

डांगे चौक येथे ग्रेडसेपरेटर बांधणेचे काम प्रगतीपथावर आहे. सदर कामाअंतर्गत ग्रेडसेपरेटर बांधणेचे काम लम्पसम प्रकारचे असुन त्याची निविदा र.रू.१४,६९,७७,२७४/- इतकी आहे. सदर रकमेवर निविदा धारकाने नोंदविलेल्या निविदा दरानुसार निविदा स्विकृती र.रू.१६,५४,९०,०००/- इतकी येत आहे. सदर ग्रेडसेपरेटरचे काम चालू करण्यापुर्वी ठेकेदाराने केलेल्या Geological Survey नुसार Ground Water Table ची खोली साधारणतः २.५० मी. खोलीवर असल्याने पावसाळ्यामध्ये नियोजित ग्रेडसेपरेटरमधिल डांबरी रस्त्यावर पाणी साचण्याची शक्यता विचारात घेता सदर डांबरीकरणाऐवजी कॉंक्रीटचे रस्ते (PQC) केल्यास पावसाळ्यामध्ये वाहतुकीस अडथळा होणार नाही. सोबत Geotechnical Survey चा अहवाल अवलोकनार्थ जोडलेला आहे. तसेच सदर डांबरी रस्त्याची देखभाल

दुरूस्तीचा भविष्यातील खर्च वाढणार आहे. लम्पसम कामाचे अंदाजपत्रकामध्ये ग्रेडसेपरेटरमधील दोन्ही बाजुचा रस्ता डांबरीकरणाचे रस्त्याचा समावेश आहे. त्यासाठी र.रू.१,१६,७७,४१२/- इतकी रक्कम खर्च होणार आहे, सद्यस्थितीत डांबरीकरण करणे ऐवजी PQC करणे उचित राहिल असे इकडील मत आहे. याकरिता र.रू.२,५६,४३,१२९ – १,१६,७७,४१५ = र.रू.१,३९,६५,७१६/- इतका अधिक खर्च येणार आहे. यामध्ये डांबरीकरणासाठी आवश्यक असलेला road crust चा विचार करता यासाठी वेगळा खर्च करावा लागणार नाही. केवळ डांबरीकरणातील DBM/BC च्या ऐवजी PQC करणे शक्य होणार आहे. तसेच सदर निविदेमधील Schedule B मधिल Civil work अंतर्गत करावयाचे रस्त्याचे पाणीपुरवठा व जलनिःसारण वाहिन्यांचे स्थलांतरीत करणे यासाठी र.रू.९,८६,९९,०३१/- इतका खर्च होणार आहे. परंतु चिंचवडकडुन भूमकर चौकाकडून जाणारा रस्ता मनपाचे विकास योजनेनुसार ३४.५० मी.रूंदीचा असून या रस्त्याचा सांगवी किवळे ४५ मी.रूंदीचा रस्ता डांगे चौक येथे क्रॉसिंग होत आहे. या चौकामध्ये अस्तित्वातील उड्डाणपुलाचे Pier Foundation मुळे, ग्रेडसेपरेटरचे संरेखनामुळे हॉटेल रोजवुड ते हॉटेल रिजंट पर्यंतचा रस्ता सुमारे ५.५० मी. रूंदीचा करावा लागणार आहे. याकरीता फुटपाथमधील व रस्त्यामधील सेवावाहिन्या रस्त्याचे कडेला स्थलांतरीत करणेत आलेल्या आहेत. यामुळे सदर रस्ता पुर्ववत करण्यासाठी रस्त्याचे काटछेद प्रमाणे Crust Develope करून DBM/BC करावे लागणार आहेत. याशिवाय चौकामधील व ग्रेडसेपरेटरच्या संरेखनामध्ये येणा-या ३००/४००/६००/१००० मि.मी. व्यासाच्या एम.एस. पाईपलाईन स्थलांतरीत केलेल्या आहेत. तसेच वाहतुक पोलिसांच्या सल्ल्याने वाहतुक वळण घेण्यासाठी रस्त्यावर डांबरीकरण करणे आवश्यक आहे. अशा बाबींचा विचार करून डांबरी करणाचे कामाचे अंदाजपत्रक तयार केले असता त्याकरीता र.रू.६६,००,०१०/- इतका खर्च येणार आहे. तसेच डांगे चौक ते पुनावळे चौकापर्यंत टाकलेल्या १२००/९०० मी.मी. व्यासाच्या पावसाळी पाण्याची नलिकासाठी केलेल्या खोदाईमध्ये सुमारे १.५ मी. ते ८.००मी. खोलीवर दगड खोदकाम करावे लागले असल्याने दगड खोदाईचा खर्च अंदाजपत्रकामधील खर्चा पेक्षा सुमारे र.रु.५४,५४,१२०/- अधिक झालेला आहे. याकरीता महाराष्ट्र म्युनीसीपल अकाउंट कोड १९७१ ,CHAPTER XI मधील अट क्र.१६७/२ **A revised estimate shall be prepared when the original estimate is likely to be exceeded by more than 10 percent or where a change of design or plan is proposed or for renewal of a work whichwas abandoned after partial execution and shall be submitted for approval as if it where an original estimate.** नुसारप्रशासकीय मान्यता र.रु.२२०.००कोटी च्या मर्यादेमध्ये सुधारीत तांत्रिक मान्यता घेवुन काम करणे शक्य

होणार आहे. तरी विषयांकीत कामाअंतर्गत PQC व डांबरीकरणासाठी र.रू.१,३९,६५,७१६ + ६६,००,०१०/- याप्रमाणे एकूण र.रू.२,०५,६५,७२६/- इतका वाढीव खर्च करावा लागणार आहे. तसेच सदर कामासाठी र.रू.२२०.०० कोटी इतकी प्रशासकीय मान्यता असलेने विषयांकीत कामासाठी निविदा स्विकृती र.रू.२६,५५,९१,९२४ + २,०५,६५,७२६ = २८,६१,५७,६५०/- इतक्या रकमेस सुधारीत तांत्रिक मान्यता घेणेत आली आहे. तसेच सदर कामासाठी लागणा-या वाढीव खर्चास सन २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकामध्ये आवश्यक तरतुद करणेत येत आहे. सदर कामासाठी सुधारित खर्च र.रू.२६,५५,९१,९२४ + २,०५,६५,७२६ = २८,६१,५७,६५०/- (अक्षरी र.रू.अठ्ठावीस कोटी एकसष्ठ लाख सत्तावन्न हजार सहाशे पन्नास फक्त) चे खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक, नगरसेवीका. हा विषय काय आहे हे समजून सांगावे, विषय लक्षात येत नाही.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक, नगरसेवीका. डांगे चौक येथे ग्रेडसेपरेटर बांधणेचे कामा संदर्भामधला विषय आहे. त्याच्यामध्ये हे २६ कोटी रुपयाच काम आहे. डांबरीकरण करायचा त्याच्यामध्ये DBM/BC मध्ये करण्याच्या माध्यमातून हा विषय होता. त्याला जर का आपण बघीतलतर दोन्ही बाजून कॉंक्रीटीकरणाचे वॉल आहेत आणि खाली जर डांबर टाकलतर कालांतराने हेवी वाहन त्यावरुन जाणार असल्यामुळे त्याठिकाणी पीक्युसी करायच आणि पीक्युसी करताना कॉंक्रीटीकरण करण्यासाठी २ कोटी ५ लाख रुपयाची तरतूद या संदर्भामध्ये आधिक वाढ यासाठीचा हा विषय आहे. म्हणजे डांबरीकरणाच्या ऐवजी पीक्यूसी करण्यासंदर्भात शेडयूल बी मध्ये बदल करुन त्यासाठी एकूण र.रू.२६,५५,९१,९२४ + २,०५,६५,७२६ = २८,६१,५७,६५०/- ला मान्यता घ्यायची आहे आणि डांबरीकरणा ऐवजी पीक्यूसी करण्यासाठी र.रू.१,३९,६५,७१६+ ६६,००,०१०/- याप्रमाणे एकूण र.रू.२,०५,६५,७२६/- इतका वाढीव खर्च करावा लागणार आहे तो खर्च करण्यासाठीची ही फक्त प्रशासकीय मान्यतासाठी विषय आहे. मा.महापौर साहेब, हा प्रशासकीय मान्यतेसाठीचा विषय आहे.

**मा.सवणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक, नगरसेवीका. थेरगाव डांगे चौक येथे महापालिकेच्या

वतीने ग्रेडसेप्रेटरच काम चालू आहे या कामामध्ये ग्रेडसेप्रेटरमधुन जो रस्ता होता तो टेंडर काढताना आपण डांबरी धरलेला होता परंतु तीथे जिओ टेक्निकल रिपोर्ट केलनंतर असं लक्षात आल की तीथ पाण्याची लेव्हल थोडी वरती आहे तर आपल्याला तीथे डांबराचा रस्ता करण्याचे ऐवजी कॉंक्रीटचा रस्ता करणे आवश्यक आहे पीक्यूसी, जसे रस्ते आपण कॉंक्रीटचे करतो तसे ग्रेडसेप्रेटर असेलतर आपण डांबराच्या ऐवजी कॉंक्रीटच अस आहे.

**मा.राहुल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक, नगरसेवीका. आमच्या संपुर्ण भागातल्या पाण्याच्या लाईन सुध्दा त्याच ब्रीज खाली आहेत, सर्वच त्याठिकाणी आहे. मग तुम्ही सुरवातीला काय म्हणत होते याठिकाणी आम्हांला जर ग्रेडसेप्रेटर करावा लागलातर आम्हांला शिफ्टींगचा प्रचंड मोठया प्रमाणात खर्च आहे. आज तुमच्याकडे ते काम चालू आहे म्हणून आमच्याकडे पाणी कमी आहे. जगताप डेअरीला तीथ पण पाणी साठतय, सेम तुम्ही असंच तीथ केलेल आहे.

**मा.सवणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक, नगरसेवीका. टेंडर काढत असतानाच आपण कॉंक्रीटचा सरफेस धरलेला होता. त्याठिकाणी डांबरीकरण धरल होतं परंतु जिओ टेक्निकल रिपोर्टमध्ये इथे देखील जमिनीमध्ये पाण्याचा स्तर हा वरती असल्यामुळे आपल्याला डांबराच्या ऐवजी कॉंक्रीट करायच आहे.

**मा.राहुल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक, नगरसेवीका. पुर्ण आमच्या भागामध्ये पिंपळेसौदागर, पिंपळे निलख, वाकड, ताथवडे, पुनावळे सगळयांनाच तीथून लाईन आहे परत तुम्ही म्हणणार कॉंक्रीट तोडायच आहे.

**मा.महापौर -** विषय क्रमांक ७ मंजूर करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६२५ विषय क्रमांक- ८
दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.राजेंद्र लांडगे, मा.शितल शिंदे यांचा प्रस्ताव –
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८९१७ दि.२६/०२/२०२१

महात्मा फुले ग्रंथालय, १ भक्ती कॉम्प्लेक्स, खराळवाडी, पिंपरी, पुणे-४११०१८ हे गेली १७ वर्षापासून ग्रंथालय चालवित आहेत. वाचकवर्ग वाढल्यामुळे सध्याची जागा अपूरी पडत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याचे पाठीमागे अल्पाईन हॉटेल समोर शासकीय मुतारी शेजारी मनपाची मोकळी जागा आहे. सदर जागेपैकी २० X २५ एवढी जागा सदर ग्रंथालयास बांधकाम करण्यासाठी देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.अंबरनाथ कांबळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६२६ विषय क्रमांक- ९
दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.नगरसचिव

<u>समित्यांचे अहवाल</u>

<u>मा.विधी समिती</u>

**अ)** दि.०५/०२/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दि.२२/०२/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.सागर आंगोळकर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.अंबरनाथ कांबळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६२७ विषय क्रमांक- १०
दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.नगरसचिव

**<u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>**

**अ)** दि.१४/०१/२०२१ व दि.१५/०१/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**ब)** दि.२८/०१/२०२१ व दि.११/०२/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.सागर आंगोळकर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.अंबरनाथ कांबळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६२८ विषय क्रमांक- ११
दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.नगरसचिव

**<u>मा.शहर सुधारणा समिती</u>**

अ) दि.०२/०२/२०२१ व दि.०३/०२/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.सागर आंगोळकर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.अंबरनाथ कांबळे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६२९ विषय क्रमांक- १२
दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.नगरसचिव

**<u>मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा</u>**

अ) दि.११/१२/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.२८/१२/२०२०, दि.०८/०१/२०२१, दि.११/०१/२०२१ व दि.२२/०१/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दि.०८/०१/२०२१, दि.११/०१/२०२१ व दि.२२/०१/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ड) दि.२८/०१/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.सागर आंगोळकर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६३० विषय क्रमांक- १३

दिनांक- १८/३/२०२१ खाते- मा.आयुक्त

**संदर्भ – १)** मा.महापालिका आयुक्त यांचेकडील प.क्र.मसाभां/४/कावि/१९६/२०२१ दिनांक १८/०३/२०२१

वैद्यकीय व वायसीएम रुग्णालयांना आवश्यक असलेली वैद्यकीय अधिकारी, स्टाफनर्स, फार्मासीस्ट, सफाई कर्मचारी इ पदे प्रत्येक सहा महीन्यासाठी मानधन स्वरुपात भरण्यात येत असतात त्याकामी वृत्तपत्रात जाहीरात प्रसीध्द करणेत येऊन परीक्षा घेण्यात येते व निवड यादी प्रसीध्द करुन सदर प्रक्रीया दर सहा महीन्याने राबवावी लागत असते. सद्यस्थितीत स्थायी आणि अस्थायी आस्थापनेवरील पद संख्या अपुरी असल्या कारणाने तात्पुरत्या स्वरुपात दर सहा महीने कालावधीकरीता अस्थायी स्वरुपात मानधनावर सर्व पदे भरली जात आहेत त्यामध्ये शासनाच्या नियमानुसार प्रत्येक सहा महीन्यानंतर जुन्या अधिकारी व कर्मचारी यांना संधी न देता नविन उनेदवारांना संधी द्यावी असा शासन निर्णय आहे. त्यामुळे प्रत्येक सहा महीन्यानंतर नविन भरती प्रक्रीया राबवावी लागते. व जुने प्रशिक्षीत झालेल्या कर्मचा-यांना काढुन नविन कर्मचा-यांना भरती करावी लागते व त्यांना प्रशिक्षण द्यावे लागते. तसेच काही कारणास्तव काही महीन्याची मुदतवाढ दिली असता सदर कर्मचारी कामगार न्यायालयामध्ये दावा दाखल करुन कायमस्वरुपी करणेसाठी दाद मागतात.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे वाय.सीए.एम रुग्णालय हे ७५० बेडचे असून सर्व विभाग अद्ययावत असून रुग्णांचे सोयीचे दृष्टीने नविन विभाग सुरु करणेत येणार आहेत. त्यामध्ये वाढीव ऑपरेशन थिएटर, वाढीव एन.आय.सी.यु व पी.आय.सी.यु वाढीव आय.सी.यु.,सी.एस.एस.डी, सी.एम.ओ इमरजन्सी ओ.टी. इ.

विभाग चालू करणेत येणार आहेत. तसेच वैद्यकीय विभागा कडील रुग्णालायाना आवश्यक पदे भरणेकरिता मागणी घेणेत आलेली आहे. तसेच महानगरपालिकेच्या इतर ९ रुग्णालयांमध्ये आणि २९ दवाखान्यांमध्येही वैद्यकीय अधिकारी, स्टाफनर्स, वॉर्डबॉय, फार्मासीस्ट, इ कर्मचा-यांची आवश्यकता आहे. मनपाकडील वैद्यकीय अधिकारी तसेच इतर कर्मचारी निवृत्त झालेनंतर त्याचा ताण इतर अधिकारी/ कर्मचा-यांवर येत आहे. मा.अधिष्ठाता, वायसीएमएच आणि सर्व रुग्णालय प्रमुख, वैद्यकीय विभाग यांनी केलेल्या मागणी नुसार वरील तांत्रीक पदे भरणेकामी बाह्यस्त्रोताद्वारे (Agency ) नेमण्याबाबत नव्याने प्रक्रीया राबविण्यात येत आहे. सदर बाब ही धोरणात्मक असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.महापौर**– सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

**----**

**(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/५/कावि/६९४/२०२१
दिनांक - ४/५/२०२१



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.